**सत्र खटला क्र. ४६/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**योगेश रमेश तोंडे वि. महाराष्ट्र शासन**
**CNR NO. MHBU20-000700-2024)**

## नि.क्र. ६७ खाली आदेश
## (पारीत दिनांक १४ जानेवारी २०२६)

**०१]** अर्जदार – **योगेश रमेश तोंडे** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. २०४/२०२४, कलम ३६४, ३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीचे पती दिलीप इंगळे हा पैशाचा पाऊस पाडत होता. त्यामुळे दिलीप इंगळे आणि अमोल राजपुत यांचे मध्ये काही दिवसांपासून पैशाच्या व्यवहारावरून वाद चालू होता. म्हणून आरोपी अमोल राजपुत याने कट रचून, पूर्व नियोजन करून दिनांक २२.०६.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास संदीप उर्फ बाबुराव शेवाळे, योगेश तोंडे, शेख साजिद शेख अजीस यांच्या मदतीने संदीप दातार याची स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच.–०३–बी.एच. १८२४ या वाहनात फिर्यादीच्या पतीला घातपात करण्याच्या उद्देशाने किंवा जिवे मारण्याच्या उद्देशाने जानेफळ येथून कोपरगाव, जि. अहमदनगर येथे नेले. त्यानंतर या आरोपींनी इतर अज्ञात इसमाच्या सहाय्याने फिर्यादीच्या पतीचे अपहरण घडवून आणल्याचे जबाबात सांगितले. फिर्यादी हिने पोलीस ठाणे, कोपरगाव, जि. अहमदनगर येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे ऑनलाईन पाठवण्यात आली. तपासादरम्यान फिर्यादीच्या पतीची निर्घृण हत्या करण्यात आली असल्याचे निष्पंन्न झाले. त्यामुळे पोलीस ठाणे, जानेफळ येथे अपराध क्र. २०४/२०२४ कलम ३६४,३६५, १२०(ब), ३०२ सह कलम ३४ भा.दं.वि. खाली गुन्हा नोंदवण्यात आला.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. ए. पी. पवार यांनी युक्तिवाद केला की, या अर्जदाराचा अर्ज माननीय उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी नामंजूर केला आहे.

परंतु तो आदेश दोषारोपपत्रातील मजकूराच्या आधारावर पारित करण्यात आलेला नाही. अभियोग पक्षाच्या कथेनुसार अर्जदार हा केवळ वाहन चालक होता व त्याने मयताला नाशिक येथे सोडून तो परत जानेफळ येथे आला होता. या प्रकरणात अर्जदाराविरूद्ध कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पुरावा आलेला नाही. या प्रकरणातील दुसरा चालक ज्याने मयत दिलीप इंगळे याला गाडीत नेले त्यास माननीय उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी जमानत दिलेली आहे. अर्जदार देखील चालक असून त्याने मयत दिलीप यास जिवंत असतांना नाशिक येथे सोडलेले आहे. त्यामुळे अर्जदार सम न्याय तत्वाच्या आधारे जमानत मिळवण्यास पात्र आहे. अर्जदार योगेश याला दिनांक १०.०७.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबध नाही. सुरूवातीची फिर्याद ही मयत दिलीप इंगळे याच्या अपहरणाबाबत दाखल करण्यात आली असून त्यामध्ये अर्जदार योगेश याचे नाव नाही. या प्रकरणात अनेक साक्षीदारांची बयाणे नोंदवण्यात आली असून अर्जदार योगेश याने दिलीप इंगळे याला जिवाने मारले असा आरोप नाही. अर्जदाराचा दिलीप इंगळे याला मारण्याचा कोणताही हेतू किंवा उद्देश नव्हता. अर्जदार हा घटनास्थळावर हजर देखील नव्हता. अर्जदार व मृतक शेवटी सोबत जातांना दिसल्याचे काही साक्षीदारांनी सांगितले. परंतु त्याने दिलीप इंगळे याची हत्या केली असे कोणत्याही साक्षीदाराने त्यांच्या बयाणात सांगितले नसल्याने अर्जदाराचे कृत्य हे मर्यादीत आहे. अर्जदाराने गुन्ह्याची माहिती पोलिसांना दिली नसल्याने त्याला या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदाराच्या अनुषंगाने संपूर्ण तपास होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. परिणामी अर्जदाराच्या अधीक कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास अर्जदार कोणत्याही अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला जामीन देण्याची विनंती केली. अर्जदाराच्या वतीने खालील प्रकाशीत न्यायनिवाड्यांवर भरोसा ठेवण्यात आला.

[01] **Suraj Dadaso Zende Vs. The State of Maharashtra, in Criminal Application (BA) No. 1183/2025, decided on 18.12.2025.**

[02] **Bhushan Vs. The State of Maharashtra, in Criminal Appeal No(s). 13740/2025, decided on 14.11.2025.**

**[03] State of Kerala Vs. Raneef, reported in (2011) 73 ACC 913.**

**[04] Sagar Vs. State of U.P., in Criminal Appeal No. 8865 of 2025, decided on on 28.11.2025.**

०४] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. एस. एम. खत्री यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, घटनेच्या दिवशी अर्जदार हा मयत दिलीप इंगळे याच्यासोबत होता. त्यावेळेस बऱ्याच साक्षीदारांनी त्याला मयतासोबत जातांना बघितले. त्यानंतर दिलीप इंगळे याची हत्या करण्यात आली. परिणामी अर्जदार व इतरांविरूद्ध अपहरण, गुन्हेगारी कट रचणे व हत्या करणे अशा गुन्ह्याची नोंद करण्यात आली. सरकारी वकील सांहेबांनी पुढे असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण आणि हत्येचे असून परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारीत आहे. अज्ञात आरोपींविरूद्ध तपास हा प्रारंभीक अवस्थेत आहे. मोबाईल आणि बोलेरो जीप जप्त होणे बाकी आहे. अर्जदाराचा या गुन्ह्यात प्रथम दर्शनी सहभाग आहे. तसेच या गुन्ह्यात इतर अज्ञात आरोपींचा देखील समावेश आहे. त्यामुळे अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो तपासात अडथळा निर्माण करू शकतो व फरार/अज्ञात आरोपींची अटक टाळू शकतो. तसेच अर्जदार साक्षीदारांना फितूर करू शकतो. म्हणून अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०५] वरील युक्तिवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरण हे अपहरण, हत्येचा कट रचणे आणि हत्या करण्याचे असल्याने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणातील मयत दिलीप इंगळे याची पाईपाच्या सहाय्याने निर्घृण हत्या करण्यात आली आहे. हत्येकरिता षडयंत्र रचण्यात येऊन बऱ्याच आरोपींची मदत घेण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अमोल राजपुत व इतर ५ ते ६ अज्ञात आरोपी अद्याप पर्यंत फरार आहेत.

०६] अर्जदार व आरोपी संदीप शेवाळे यांच्या पोलिसांसमोरील बयाणावरून असे दिसून येते की, अर्जदाराने रू. ३०,०००/- भाडे स्विकारून संदीप शेवाळे याच्या सांगण्यावरून मयत दिलीप याला शिर्डी, कोपरगाव येथे नेऊन सोडले व त्यावेळेस दुसऱ्या

ट्रीबर वाहनातील अज्ञात लोकांनी दिलीप इंगळे याला मारहाण केली. आरोपी संदीप शेवाळे याच्या बयाणावरून असे दिसून येते की, अर्जदार योगेश याला पैशाचा पाऊस व त्यासाठी मयत दिलीप इंगळे याचा वापर करण्यात येणार असल्याचे माहिती होते हे दिसून येते व त्यासाठी अर्जदार योगेश याने ४०० कि.मी. गाडी चालवण्यासाठी रू. ३०,०००/– अशी भली मोठी रक्कम स्विकारल्याचे दिसून येते. याशिवाय फिर्यादीचे बयाण व इतर साक्षीदारांच्या बयाणावरून अर्जदार योगेश हा मयत दिलीप इंगळे याच्यासोबत गाडीतून जातांना दिसला हे स्पष्ट होते. माननीय उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी झेंडे नावाच्या चालकास त्याला घटनेबाबत काहीही माहिती नसल्याचे कारणावरून जमानत दिली आहे. परंतु अर्जदाराला घटनेबाबत माहिती असतांना व त्याच्या समक्ष मयत दिली याला मारहाण झाली असतांना त्याने ही बाब कोणालाही सांगितलेली नाही. परिणामी अर्जदार सम न्याय तत्वाच्या आधारे जमानत मिळवण्यास अपात्र आहे आणि याच कारणास्तव प्रकाशित न्यायनिवाड्यांचा फायदा अर्जदाराला होत नाही. या प्रकरणातील अज्ञात आरोपी पकडायचे असल्याने अर्जदार याचा हत्येचा कट रचणे व हत्या करणे अशा गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे म्हणणे न्यायोचित ठरत नाही.

०७] या प्रकरणात बुलढाणा, अहमदनगर, शिर्डी, बारामती, कर्जत येथील विवीध व अज्ञात आरोपींचा सहभाग असून गुन्ह्याचे स्वरूप क्लिष्ट आहे. त्यामुळे सर्व आरोपींच्या अटकेनंतर पुराव्याची जुळवा–जुळव होऊन प्रत्येक आरोपीचे कृत्य स्पष्ट होणार आहे. परिणामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. याशिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार होऊ शकतो आणि साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. शिवाय अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो फरार आरोपी व अज्ञात आरोपींना पलायन करण्यास मदत करू शकतो.

०८] प्रस्तुत प्रकरणात अनेक आरोपींचा सहभाग असून अर्जदाराविरूद्ध प्रथम–दर्शनी पुरावा मिळून आलेला आहे. या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल केले असले तरीही मुख्य आरोपी व इतर अनेक अज्ञात आरोपी फरार आहेत. त्यामुळे अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार आहे. म्हणून अर्जदाराला वरील प्रकाशीत न्यायनिवाड्यांचा फायदा

मिळत नाही. एकंदरीत अर्जदाराने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप, गंभीरता, गुन्ह्यासाठी असलेली मृत्यूदंड शिक्षेची तरतूद, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

जामीन अर्ज (नि.क्र. ६७) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.01.15 17:47:16 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – १४.०१.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – १४.०१.२०२६